ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १७ फेब्रुवारी, १९५४ | अंक ७

## विविध माहिती

**अमेरिकेंत पंजाबमधील शेतकरी**—भारत आणि अमेरिका ह्यांतील शेतकऱ्यांनीं एकमेकांच्या देशाला भेटी देण्याच्या कार्यक्रमाप्रमाणें पंजाबमधील ५ शेतकरी लवकरच अमेरिकेला जाणार आहेत. पंजाबमधून १०० चे वर सुशिक्षित शेतकऱ्यांच्या ह्या कामासाठीं मुलाखती घेण्यांत आल्या. कांहीं अमेरिकन शेतकरीहि लवकरच पंजाबला भेट देणार आहेत.

**राजस्थानच्या शेतकऱ्यांना कर्जें**—राजस्थानमधील शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यास मदत देतां यावी म्हणून राज्य सरकारनें २५,००,००० रुपयांचीं कर्जें देण्याचें ठरविलें आहे. वरील रकमेपैकीं १३,००,००० रुपयांची रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या हवालीं करण्यांत आली आहे. जयपूर, जोधपूर व बिकानेर भागांतील शेतकऱ्यांना प्रत्येकीं १,००० रुपयांचीं कर्जें देण्याचा अधिकार त्यांना देण्यांत आला आहे.

**चांदी गाळण्याची भट्टी**—चांदीचें कमी प्रमाण असलेल्या नाण्यांतून चांदी काढण्यासाठीं एक नवी भट्टी कलकत्ता येथें काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कलकत्ता येथील टांकसाळींत ह्यासंबंधीं बरेच प्रयोग करण्यांत आले. प्रयोगांतीं एक नवीन पद्धत शोधून काढण्यांत आली; तिचा उपयोग नव्या भट्टींत करण्यांत येणार आहे.

**भारतासाठीं कॅनेडाचीं रेल्वे-एंजिनें**—भारतानें कॅनडाकडून रेल्वेचीं १२० एंजिनें घेण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें कॅनेडिअन लोकोमोटिव्ह कंपनीकडे मागणी नोंदविण्यांत आली आहे. सर्व एंजिनांना मिळून २ कोटी डॉलर्स किंमत पडेल. एंजिनें बांधण्याचें काम अद्याप सुरू व्हावयाचें आहे. पण पहिलें एंजिन १२ महिन्यांच्या आंतच मिळेल आणि बाकीचीं १९५५ अखेर मिळतील असें समजतें.

**विमानें आहेत, पण विद्यार्थी नाहींत**—दिल्ली येथील विमानक्लबाचा रौप्यमहोत्सव लवकरच साजरा होणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठीं संस्थेजवळ ५ शिकाऊ विमानें आहेत. पण चालू सालीं शिकणाऱ्यांची संख्या मात्र दोनवर उतरली आहे. गेल्या वर्षी ह्याच वेळेला ३२ विद्यार्थी होते. शिकलेल्या वैमानिकांतील बेकारीमुळें विद्यार्थ्यांची संख्या घटली असावी असा अंदाज आहे. शिवाय, शिकाऊ उड्डाणाला प्रत्येक तासाला २५ रुपये द्यावे लागतात. ही फी जबर आहे, असें म्हणतात.

**जलहाली येथील कारखाना**—म्हैसूर राज्यांत मध्यवर्ती सरकारनें काढलेला यांत्रिक हत्यारांचा कारखाना चालू सालच्या जुलै महिन्यापासून उत्पादन करूं लागेल, असें समजतें. कारखान्याचें एकूण भांडवल ८ लाख रुपयांचें राहील. सध्यां मात्र ३ लाख रुपयांच्या भांडवलालाच परवानगी देण्यांत आली आहे.

**रशिआची व्यापारी आघाडी**—रशिआनें ब्रिटनपासून ४० कोटी पौंडांचा माल विकत घेण्याची तयारी नुकतीच दाखविली होती. तीवर भाष्य करतांना अमेरिकेंतील ‘वॉशिंग्टन पोस्ट’ हें पत्र म्हणतें कीं, रशिआच्या ह्या डावाला खरें उत्तर म्हणजे अमेरिकेनें ब्रिटनला अधिक माल अमेरिकेंत विकूं देणें हेंच आहे; अमेरिका अधिक सुसंगत धोरण अवलंबणार नाहीं, तर रशिआला आणखीहि प्रचारात्मक जय मिळत राहतील.

**ह्या धोरणाचा अर्थ काय?**—सो. रशिआशीं भारताचा व्यापारी करार झाल्यापासून उभयता देशांत थोडाबहुत व्यवहार चालू झाला आहे. ह्या व्यवहारांत बँकांनाहि आपलें काम करावें लागतें. पण ह्यासंबंधी अडचणी निर्माण झाल्या आहेत. मुंबईतील एका कंपनीनें रशिआंतून वृत्तपत्राचा कागद आणण्यासाठीं एका ब्रिटिश बँकेला लेटर ऑफ क्रेडिट देण्याची विनंति केली होती. पण बँकेनें तें देण्याचें नाकारलें.

**मद्रास राज्यांत देवळांची दुरुस्ती**—मद्रास राज्यांत ७,८४९ देवस्थानें आहेत आणि त्यांपैकीं बहुतेक तंजावर जिल्ह्यांत आहेत. पैकीं ७,५९६ देवस्थानांचें वार्षिक उत्पन्न २० हजार रुपये अगर त्यापेक्षा कमी आहे. १११ देवस्थानांचें वार्षिक उत्पन्न २०,००० ते ६०,००० रुपयांच्या दरम्यान आहे आणि ४१ देवस्थानांचें वार्षिक उत्पन्न ६०,००० रुपयांपेक्षा अधिक आहे. ह्या देवळांची दुरुस्ती करण्याचें शिक्षण एंजिनिअर्सना देण्यासाठीं मद्रास सरकारनें एक योजना तयार केली आहे.

**पाकिस्तानांतील सहकारी बँका**—पाकिस्तान सरकारनें सर्व सहकारी बँकांना असे हुकूम दिले आहेत कीं त्यांनीं कंपन्यांना अगर व्यक्तींना कर्जें देण्याचें बंद करावें. बँकांनीं दिलेलीं सुमारें १ कोटी रुपयांचीं कर्जें बुडाल्यासारखींच असल्यानें असा हुकूम काढण्यांत आल्याचें समजतें. भारताच्या फाळणीनंतर बिगर-मुसलमान बँकर्स भारतांत निघून गेले. त्यामुळें व्यापाऱ्यांना व उद्योगधंदेवाल्यांना कर्जें मिळेनाशीं झालीं होतीं. ती गरज वरील बँकांनीं भागविली होती.

**रशिआचें फिनलंडला कर्ज**—सोव्हिएट रशिआनें फिनलंडला ४ कोटी रुबल्सचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. हें कर्ज सोन्याच्या रूपानें, डॉलर्समध्यें अगर उभयतांना मान्य असलेल्या कोणत्याहि परकीय हुंडणावळींत देण्यांत येणार आहे.

**लग्नापूर्वी रक्तपरीक्षेची मागणी**—घरकाम करणाऱ्या ब्रिटनमधील स्त्रियांनीं अशी मागणी करण्यास सुरवात केली आहे कीं, लग्न होण्यापूर्वी वधू-वरांची सक्तीनें रक्तपरीक्षा करण्यांत यावी. आपल्या मागणीला लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठीं संघटनेतर्फे लवकरच जोराचा प्रचार करण्यांत येणार आहे.

## गांधीजींची पुण्यतिथि : जिनीव्हा रेडिओवरील कार्यक्रम

गेल्या महिन्याच्या २९ तारखेला जिनीव्हा रेडिओवरून महात्माजींच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम सादर करण्यांत आला. 'गांधींच्या मृत्यूला सहा वर्षे झाली' असें कार्यक्रमाचें शीर्षक होतें. गांधीजींचे एक जुने स्नेही, प्रोफेसर एडमंड प्रिव्हॅट ह्यांनीं महात्माजींच्या कांहीं आठवणी मोठ्या तन्मयतेनें सांगितल्या. नंतर गांधीजींच्या तत्त्वज्ञानासंबंधीं कांहीं विवरणात्मक प्रश्नोत्तरें झालीं. जिनीव्हा रेडिओकेंद्राच्या एका वार्ताहरानें प्रश्न विचारण्याचें काम केलें. ह्या वार्ताहरानें २० वर्षांपूर्वी गांधीजींना कांहीं प्रश्न स्वरोखरच विचारले होते. त्यावेळीं जिनीव्हाचे जवळील एका शाळेंत सदर वार्ताहर विद्यार्थी होता. महात्माजी सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक रोमाँ रोलां ह्यांना भेटण्यासाठीं गेले होते त्यावेळीं त्यांनीं ह्या शाळेला भेट दिली होती. प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें काम एम्. जीन हर्बर्ट ह्यांनीं केलें. जीन हर्बर्ट हे गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे एक थोर अभ्यासक आहेत. संयुक्त राष्ट्र-संघटनेंत एक अव्वल दर्जाचा दुभाषा म्हणूनहि त्यांनीं काम केलेलें आहे. महात्माजींच्यावर प्राणघातक गोळीबार झाल्यावर सुद्धां त्यांनीं खुनी इसमाला तेथल्या तेथेंच क्षमा केली हें खरें काय असा एक प्रश्न विचारण्यांत आला. त्याला "होय, त्यांनीं क्षमा तर केलीच; पण 'हे राम' असे शब्द उच्चारून त्याला आशीर्वादहि दिला, त्याला आपले शिष्य बनविले आणि त्याचा पुढील जन्म अहिंसामय होईल अशी तरतूद केली" असें उत्तर देण्यांत आलें. त्यानंतर गांधीजींच्या स्वतःच्या आवाजांतील एक ध्वनिमुद्रिका लावण्यांत आली. महात्माजींच्या एका आध्यात्मिक संदेशाची ती ध्वनिमुद्रिका होती. शेवटीं 'महात्मा गांधींच्या स्मरणार्थ' ह्या शीर्षकाचें एक गीत वाजविण्यांत आलें. हें गीत ब्रायन बॉयडेल ह्यांनीं मुद्दाम रचलेलें होतें.

## मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांची परिस्थिति

कलकत्ता येथील फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ स्मॉल अँड मीडिअम इंडस्ट्रीज ह्या संस्थेनें मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांच्या सध्यांच्या परिस्थितीविषयीं एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ह्या उद्योगधंद्यांचा आढावा घेतांना असे विचार व्यक्त करण्यांत आले आहेत कीं, मागणीच्या अपुरेपणामुळें धंद्यांच्या उत्पादनक्षमतेपैकीं ३५ टक्के उत्पादनक्षमताच वापरली जात आहे. आपला माल विकण्याबाबत फार कठीण परिस्थितीला त्यांना तोंड द्यावें लागत आहे. गिऱ्हाईक हें परदेशी माल अधिक पसंत करतें. त्यामुळें परदेशाहून आयात झालेला माल मात्र खपत आहे. परदेशी मालापेक्षा तशाच प्रकारचा देशी मालच आपण शक्यतोंवर घेऊं, असें आश्वासन सरकारनें दिलें आहे. परंतु ह्या आश्वासनांचा प्रत्यक्षांत कांहीं उपयोग होत नाहीं. मागणीला अनुसरून जितके कारखाने असावयास पाहिजेत त्यापेक्षा अधिक कारखाने आणि तेहि आर्थिक दृष्ट्या आंतबट्ट्याचे, असे काढण्यांत येत आहेत. त्यामुळें स्पर्धा अतिशय वाढली आहे. ज्या क्षेत्रांत भारतीय भांडवल गरजा भागवूं शकेल त्याच क्षेत्रांत परकीय भांडवलहि घुसत आहे. त्यामुळें परिस्थिति अधिकच बिघडली आहे. त्याशिवाय कच्च्या मालाच्या चढ्या किंमती, योग्य प्रकारच्या मालाचा अभाव, तांत्रिक मार्गदर्शनाचा अभाव आणि दलालांची अडवणूक, ह्याहि अडचणी जाणवत आहेत. ह्यावर उपाय म्हणून स्वदेशी माल घेण्याची मोहीम हातीं घेण्यांत यावी. त्याचप्रमाणें जो माल भारतांत तयार होत असेल तशा प्रकारच्या परदेशी मालाला बंदी घालण्यांत यावी. परकीय भांडवलहि देशांत येऊं देऊं नये आणि कारखान्यांना भांडवलाची मदत करण्यांत यावी.

## कण आणि क्षण

(सुखी जीवनाच्या पाउलवाटा) लेखक-श्रीपाद वामन काळे, संपादक 'अर्थ' पुणें ४, मूल्य २॥ रुपये.

"प्रसिद्ध अर्थ साप्ताहिकाचे संपादक श्री. काळे हे अर्थशास्त्रांत जसे पारंगत आहेत तसेंच व्यवहारशास्त्र आणि प्रपंच कला यांमध्येंहि मोठे निष्णात आहेत, ही गोष्ट १६८ पानांच्या या वाचनीय ग्रंथानें सिद्ध केली आहे, असें आम्हांस वाटतें. प्रस्तुत पुस्तकांत भगिनी, किर्लोस्कर, स्त्री व वाङ्मयशोभा इत्यादि नियतकालिकांतून पूर्वींच प्रसिद्ध झालेले एकंदर तीस लेख आहेत. हे सर्व लेख प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनींपासून तहत पेनशनींत निघालेल्या वयोवृद्ध स्त्री-पुरुषांनीं वाचून मनन करण्यासारखे आहेत. श्रीयुत काळे यांची लेखनशैली सुबोध, ओघवती व क्वचित् मार्मिक विनोदानें नटलेली असल्यानें उत्कृष्ट लघुनिबंधासारखें हें पुस्तक मोठें मनोरंजक व उद्बोधक झालें आहे. आमच्या माहितीप्रमाणें मराठी भाषेंत अशा तऱ्हेचें हें पहिलेंच पुस्तक आहे. हें पुस्तक कन्या विद्यालयांत पाठ्य-पुस्तक म्हणून लावण्याच्या योग्यतेचें असून प्रौढ विद्यार्थ्यांना पुरवणी वाचनासाठी उपयुक्त ठरेल असें आम्हांस वाटतें. हें पुस्तक लिहून श्री. काळे यांनीं जी समाजसेवा केली आहे त्याबद्दल ते सर्व मराठी वाचकांच्या हार्दिक अभिनंदनास पात्र आहेत." —गर्जना १-१-१९५४

**कुंभनगरांतील गीता-पूजा**—नुकत्याच पार पडलेल्या कुंभमेळ्यांत लाखों यात्रेकरूंनीं सामुदायिक रीत्या गीतापठण केलें. तत्पूर्वी गीतेच्या श्लोकांची पूजा करण्यांत आली. सर्व गीता तीन धातूंच्या पत्र्यावर कोरण्यांत आली होती. एक ताम्रपत्र, एक रौप्यपत्र आणि एक सुवर्णपत्र ह्यावर मिळून सर्व गीता कोरण्यांत आली होती. गीतेच्या आरतींत राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसादहि सामील झाले होते.

**राष्ट्रीयीकरणानंतर तोटा**—पांच महिन्यांपूर्वी भारतामधील विमान कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. पण तेव्हांपासून त्यांना फायदा झाल्याचें आढळून आलेलें नाहीं. उलट, दर महिन्याला ६ लाख रुपयांचा तोटाच येत आहे, असें समजतें. राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी सरकार ह्या कंपन्यांना कित्येक लाख रुपयांची मदत करीत असेच.

**स्वीडन-रशिआ व्यापारी करार**—स्वीडन आणि रशिआ ह्यांच्यांत नुकताच एक व्यापारी करार झाला आहे. कराराप्रमाणें दोन्ही देशांतील व्यापाराची अधिकच वृद्धि करण्यांत येणार आहे. उभयता राष्ट्रांची देवाण-घेवाण १ कोटी ते १ कोटी, ३० लाख पौंडांची होईल.

**अमेरिकेंत पुस्तकांचा वाढता खप**—अमेरिकेंत पुस्तकांचा खप वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे. गेल्या वर्षी १२,००० नवीं पुस्तकें अगर जुन्या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या प्रसिद्ध करण्यांत आल्या. सगळ्यांत अधिक पुस्तकें धार्मिक विषयावरील खपलीं. बाल-वाङ्मयाचा खप १९५२ सालापेक्षा १२ टक्क्यांनीं वाढला.

**आर्थिक अरिष्टाचें भाकीत**—हार्वर्ड विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. जी. हार्बिअर ह्यांनीं असें भाकित केलें आहे कीं, १९४८-४९ सालीं अमेरिकेंत जशी आर्थिक मंदी आली होती तीपेक्षा अधिक जोराची मंदी आतां येणार आहे पण ही मंदी १९२९-३३ सालीं आलेल्या मंदीपेक्षा मात्र कमी जोराची असेल असें त्यांचें म्हणणें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ फेब्रुवारी, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विणकरांची स्वतःची सूत-गिरणी

( दि आंध्र को. स्पिनिंग मिल्स लि. )

विणकरांच्यासाठी एक खास स्पिनिंग मिल स्थापन करण्याची कल्पना मद्रास स्टेट हँडलूम वीव्हर्स को. सोसायटीच्या डायरेक्टरांनीं १९४६ मध्यें पुढें मांडली. ह्या सोसायटीच्या पटावर विणकरांच्या १,००० सोसायट्या असून त्यांचेजवळ २,००,००० हातमाग आहेत. १९४८ मध्यें, गुंटकल येथें मिल स्थापण्यांत यावी, असें ठरलें. १९५१ मध्यें गिरणी सहकारी सोसायटी म्हणून नोंदण्यांत आली. तिचें अधिकृत भांडवल ४५ लक्ष रुपये असून त्यापैकीं ५०% भांडवल विणकरांच्या सोसायट्यांनीं उभारलेलें आहे. प्रांतिक सोसायटीनें १५½ लक्ष रुपयांचे भाग घेतले. आंध्र राज्यनिर्मितीनंतर आवश्यक त्या आर्थिक तडजोडी करण्यांत आल्या. २६ जानेवारी, १९५३ रोजीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं गिरणीच्या पायाचा दगड बसविला. सबंध गिरणी "एअर कंडिशन्ड" करण्यांत आली आहे. गिरणींत २४,००० चात्या बसवितां येतील, ह्या बेतानें योजना केलेली आहे. तथापि, भारत सरकारनें तूर्त फक्त ११,००० चात्या मंजूर केल्या आहेत. चात्या वाढविण्यासाठीं मध्यवर्ती सेस-फंडांतून गिरणीस १५,००,००० रु. कर्ज मिळावें, अशी शिफारस प्रांतिक सरकारनें केली आहे. १९५४ अखेर २०,००० चात्या चालू होतील अशी अपेक्षा आहे. गिरणींतून दोन पाळ्या काम ह्या हिशेबानें दररोज ५०० गांठी सूत तयार होईल आणि पुढें ८५० गांठींपर्यंत उत्पादन वाढेल. तयार झालेलें सर्व सूत आंध्र हँडलूम वीव्हर्स को. सोसायटीच्या स्वाधीन केलें जाईल. गिरणींतील कामगारांसाठीं २०० बिऱ्हाडें बांधण्यासाठीं ५½ लक्ष रुपयांचें कर्ज भारत सरकारकडे मागण्यांत आलें आहे. गिरणींत बसविण्यांत आलेल्या यंत्रसामुग्रीवरील आयात जकात तिला भरतां यावी, म्हणून भारत सरकारनें हँडलूम डेव्हलपमेंट फंडांतून १,८८,००० रुपये गिरणीस दिले आहेत.

विणकरांच्या दुःस्थितीवर वेगवेगळे उपाय वेळोवेळीं सुचविण्यांत आले होते व येत आहेत. हातमागाच्या धंद्याची घडी नीट बसविण्यासाठीं श्री. राजगोपालाचारी ह्यांच्या नेतृत्वाखालील मागणीमुळें गिरणीकापडावर पट्टी बसविण्यांत आली, तिचे ४ कोटी रुपये जमले आहेत. ही रक्कम आतां हातमागांच्या विकासासाठीं उपलब्ध आहे. तथापि, विणकरांची मुख्य अडचण कच्चा माल-सूत-मिळण्याबाबतची असते, आणि ती दूर करण्यास त्यांची स्वतःची गिरणी असणें हें सर्वोत्कृष्ट साधन आहे. अशी गिरणी सुरू करण्याचा मान सर्वांत नव्या संघराज्यास-आंध्रला-मिळाला आहे. मद्रास राज्यांत तिरुनेलवेली येथें अशीच गिरणी लवकर सुरू होणार आहे. इतर कांहीं राज्यांतहि ह्या गिरण्यांचें अनुकरण होणें अस्वाभाविक नाहीं.

आंध्र राज्यांत ३,००,००० हातमाग आहेत, व त्यांना १५,००० गांठी सूत लागतें तें आंध्रमधील तीन गिरण्या आणि मद्रास, मुंबई व म्हैसूर राज्यांतील गिरण्या ह्यांचेकडून घेतलें जातें. आंध्र राज्य सूत पुरवठ्यासाठीं स्वयंपूर्ण व्हावें, अशी कल्पना आतां डोकावूं लागली आहे. गुंटकल येथें स्थापन झालेली गिरणी आंध्रच्या एकूण वार्षिक मागणीच्या एकपंचमांश मागणी पुरी पाडूं शकेल. गुंटकलच्या आसपास कपास भरपूर उपलब्ध असल्यानें, कपास तें कापड हा पल्ला थोडक्यांत गांठला जाईल व मध्यस्थांना मिळणाऱ्या नफ्याची बचत होईल. भारतांतील ह्या पहिल्याच सहकारी उपक्रमाकडे सर्वांचें लक्ष वेधून राहील, हें उघड आहे. मद्रासचे मुख्य मंत्री श्री. राजगोपालाचारी ह्यांनीं गिरणीला पाठवलेल्या संदेशानें हा लेख पुरा करणें उचित होईल. ते म्हणतात, "गुंटकल येथें ज्या विणकरांनीं ही स्वतःची गिरणी उभारली आहे, त्यांचा उत्कर्ष होवो. आतां तयार कापडाच्या उठावाचा प्रश्न उभा राहील हें विसरून भागणार नाहीं. त्यासाठीं प्रत्येकजण शक्य तें साहाय्य करो!"

---

## आग्नेय आशियाच्या विकासासाठी युनायटेड कमर्शिअल बँकेचा हातभार

### "बिर्ला-ठाकूर योजना" लवकरच बाहेर पडेल

युनायटेड कमर्शिअल बँकेच्या रंगून येथील स्वतःच्या नव्या इमारतीचें उद्घाटन ब्रह्मदेशाच्या पंतप्रधानांनीं ९ फेब्रुवारी रोजीं केलें. त्यावेळीं ब्रह्मदेशाचे मंत्री, परराष्ट्रांचे वकील, युनियन बँक ऑफ बर्माचे गव्हर्नर, बँकर्स, व्यापारी, इत्यादि उपस्थित होते. ज्या देशांत काम करावयाचें, त्या देशाच्या उद्धारांतच स्वतःचा फायदा व समाधान मानण्याचें बँकेचें धोरण पंतप्रधानांनीं गौरविलें. बँकेचे जनरल मॅनेजर श्री. बी. टी. ठाकूर समारंभासाठीं भारतांतून मुद्दाम गेले होते. ते आपल्या प्रास्ताविक भाषणांत म्हणाले, "दहा वर्षांच्या अवधींतच, आमच्या बँकेस फार मोठा दर्जा प्राप्त झाला आहे. पौर्वात्य देशांत स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय बँकांत ह्या बँकेचें स्थान अत्युच्च आहे. युनायटेड कमर्शिअल बँक भारतांत नोंदलेली असली, तरी ज्या ज्या देशांत ती काम करते, त्या त्या सर्व देशांची ती समजली पाहिजे. सबंध आग्नेय आशियाच्या आर्थिक उद्धारासाठीं देशां-देशांत फरक न करतां सहाय्य करणारी ती आर्थिक संघटना आहे. अखिल जगतांत युनायटेड कमर्शिअलला जो मान आहे, तो पौर्वात्य देशांतहि आर्थिक प्रगति घडवून आणणारी पुरेशी कल्पक माणसें आहेत, ह्याचा निदर्शक आहे. शिक्षण, प्रयत्न आणि शिस्त ह्यांच्यामुळें पूर्व पाश्चिमेशीं आर्थिक प्रगतीचे बाबतींत बरोबरी करूं शकेल. त्या प्रगतीला आध्यात्मिक पार्श्वभूमि असल्यामुळें, आर्थिक क्षेत्रांत समाधानी वातावरण निर्माण होऊं शकेल. पूर्वेकडील अविकसित देशांना अद्याप फार मोठा पल्ला गांठावयाचा आहे व त्यासाठीं नव्या आर्थिक संस्थांची आवश्यकता आहे. बँकेचे चेअरमन श्री. बिर्ला व मी ह्या दृष्टीनें नव्या पद्धतीच्या आर्थिक संस्था स्थापण्याच्या प्रश्नाकडे कसून लक्ष देत आहों. आग्नेय आशियांतील देश ज्यामुळें सहकारी वृत्तीनें एकत्र

येऊं शकतील, उद्योगधंद्यांस भांडवलाचा पुरवठा होईल व सामान्य मनुष्याचा राहणीचा दर्जा वाढूं शकेल, अशा स्वरूपाची योजना आम्हीं दोघें लवकरच तयार करूं अशी आशा आहे. आमची योजना तयार झाली, कीं आग्नेय आशियांतील देशांच्या पुढाऱ्यांना आम्हीं विश्वासांत घेऊन, ती त्यांना पटवून देऊं."

## सहकारी आणि ग्रामोद्योग प्रदर्शन मुंबईंत भरविणार

### सहकारी चळवळीच्या सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम

को. केडिट सोसायटीज ॲक्ट पास होऊन भारतांत सहकारी चळवळीस प्रारंभ झाला, तो दिवस म्हणजे २४ मार्च, १९०४ हा होय. सहकारी चळवळीचा सुवर्ण महोत्सव २५ मार्च १९५४ रोजीं व त्यानंतरचे दोन दिवस साजरा करण्याचें मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटनें ठरविलें आहे. त्या समारंभाचा एक भाग म्हणून मुंबई येथें कावसजी जहांगिर हॉलमध्यें एक सहकारी व ग्रामोद्योग प्रदर्शन भरविलें जाईल. २६ मार्च पासून सुमारें एक आठवडा तें उघडें राहील. आदिवासी, हातमाग, भरतकाम, खेडेगांवी उद्योगधंदे, इत्यादि विभाग प्रदर्शनांत असतील. वेगवेगळ्या सहकारी संस्थांमध्यें व्यावसायिक सांधा साधण्याचें कार्य प्रदर्शनामुळें सुरू होईल अशी अपेक्षा आहे. तक्ते, चित्रें, प्रतिमा, इत्यादींच्या द्वारां मुंबई राज्यांतील वेगवेगळ्या सहकारी संस्थांची प्रगति चित्रित करण्याचाहि इन्स्टिट्यूटचा विचार आहे. गेल्या ५० वर्षांत सहकारी चळवळीनें मिळविलेलें यश लक्षांत यावें व पुढील अपेक्षांचीहि कल्पना यावी, अशी प्रदर्शनाची मांडणी केली जाईल.

### रेशमाच्या कारखान्यांतील कामगार

भारतीय सरकारच्या मजूर खात्यातर्फे रेशमाच्या कारखान्यांतील कामगारांच्या परिस्थितीचा आढावा प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसतें कीं भारतामध्यें रेशमाच्या ३१ प्रमुख गिरण्या आहेत. ह्या गिरण्यांतून १९५१ च्या जुलै महिन्यांत १२,६५१ कामगार काम करीत होते. ही संख्या १९५२ च्या जुलैमध्यें ९,१२० इतकीच आढळून आली. धंद्याची परिस्थिति बिघडल्यामुळें संख्येंत घट झालेली दिसून येते. कांहीं गिरण्या बंदच पडल्या आहेत तर कांहींनीं कामगारांची संख्या कमी केलेली आहे. कामावर असणाऱ्या ७,३५० लोकांपैकी ८८ टक्के पुरुष आहेत आणि १२ टक्के स्त्रिया आहेत. एका वर्षाच्या अवधींत एकूण कामगारांशीं कायम कामगारांचें असलेलें प्रमाण ७४·९ टक्क्यावरून ६७ टक्क्यांपर्यंत खालीं आलेलें आहे. बिगर कुशल कामगारांना दरमहा मिळणारा पगार निरनिराळ्या राज्यांत निरनिराळा दिसून आला. मुंबई राज्यांत हा पगार २२ रु. १२ आण्यांपासून ३० रुपयांपर्यंत आढळून आला. पंजाबमध्यें तो ३२ रुपयांपासून ३५ रुपयांपर्यंत आढळून आला व म्हैसूर राज्यांत पुरुष कामगारांना ९ रुपये १२ आण्यांपासून १६ रु. ४ आण्यांपर्यंत मिळत होता. मद्रासमधील एका गिरणींत आणि सौराष्ट्रामधील एका गिरणींत तो सर्वांत कमी म्हणजे अवघा ६ रु. ८ आ. इतकाच होता. चार गिरण्या सोडून इतर सर्व गिरण्यांत महागाई भत्ता देण्याची पद्धत दिसून आली. इतर राज्यांपेक्षां मुंबई राज्यांत महागाई भत्त्याचें प्रमाण अधिक असल्याचें दिसून आलें. १२ गिरण्यांमधून प्रॉव्हिडंट फंडाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. महागाई भत्ता न देणाऱ्या ४ गिरण्यांपैकी दोन गिरण्या सर्वच वेतन पगार म्हणून देत होत्या.

### श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी ह्यांचा मृत्यु

सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे संस्थापक व गेल्या ऑक्टोबर, १९५३ पर्यंत सतत १८ वर्षे तिचे चेअरमन म्हणून काम करीत असलेले श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी हे ता. ९ फेब्रुवारी रोजीं दिवंगत झाले, हें नमूद करण्यास दुःख होतें. संस्थेच्या हिताकरितां त्यांनीं निःस्वार्थीपणें परिश्रम केले व लांब मुदतीच्या कर्जाचे व्यवहाराबाबत त्यांनीं बहुमोल सेवा केली. त्यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ ३ ऑगस्ट, १९५२ रोजीं नागरी पुरवठा मंत्री ना. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें झाला, त्यावेळीं त्यांच्या कार्याचा झालेला गौरव वाचकांच्या परिचयाचा आहेच.

### नवें को. ट्रायब्यूनल

१ श्री. क्षितीशचंद्र सेन, बी. ए. (कलकत्ता व कँटब), अध्यक्ष.

२ श्री. जी. पी. मुर्डेश्वर, बी. ए., एलएल. बी.

३ श्री. सुखदेव तोताराम मोरे.

मुंबई सहकारी कायद्यान्वयें, मुंबई सरकारनें सहकारी ट्रायब्यूनलची वरीलप्रमाणें पुनर्रचना केली आहे.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

३१ डिसेंबर १९५३ चा ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १६,००,००० | कॅश इ. | ४५,७७,८८७ |
| रिझर्व्ह फंड | ६,१६,००० | इन्व्हेस्टमेंटस् | १,३९,६७,७७६ |
| ठेवी | ३,४९,३१,११३ | ॲडव्हान्सेस | १,७६,२२,५४८ |
| नफा | २,८८,८५७ | इमारत | ७,५९,९०६ |

### इंपीरिअल बँकेच्या सोन्याची चोरी

इंपीरिअल बँकेच्या हुबळी शाखेचे एजंट श्री. एस. एस. जोशी हे हवेरी पे ऑफिसकडे जाऊन बुधवार, ता. १० रोजीं सायंकाळीं परत आले. येतांना त्यांनीं २०,००० रुपये किंमतीचें २२५ तोळे सोनें आणलें पण येण्यास उशीर झाल्यामुळें त्यांना तें बँकेंत ठेवतां आलें नाहीं. म्हणून, एका पिशवींत खाटेखालीं ते लपवून त्यावर निजले. सकाळीं ते उठले, तेव्हां पिशवी नाहींशी झालेली आढळली. त्यांचेवर पाळत ठेवून, चोरांनीं रात्रीं गज वाकवून घरांत प्रवेश मिळवून सोनें लांबविलें. शाखा-शाखांतून पैशाची ने-आण करावी लागते, त्यावेळीं धोका किती मोठा असतो, हें ह्या हकीकतीवरून स्पष्ट होईल व दक्षता वाढविण्याचें महत्त्व लक्षांत येईल.

**त्रिमिति चित्रपटाची वास्तवता**—पाकिस्तानमधील हैद्राबाद शहरांत एका चित्रपट-गृहांत त्रिमिति-पट दाखविण्यांत येत होता. त्रिमिति पटांत डोंगरावरून घसरणारे मोठाले धोंडे प्रेक्षकांकडे येत आहेत असा एक देखावा होता. हा देखावा रजतपटावर आल्याबरोबर प्रेक्षकांत एकच घबराट उडाला आणि कित्येक प्रेक्षक आपलीं मुलें सोडून दरवाजाकडे पळून गेले!

**दोन पौंड वजनाचें सफरचंदाचें फळ**—एमिल जॉन्सन नांवाच्या स्वीडिश बागायतदारानें २ पौंड वजनाचीं आणि उत्कृष्ट स्वाद असलेलीं सफरचंदाचीं फळें निर्माण केलीं आहेत. दोन जातींच्या सफरचंदापासून हें नवें फळ उगविण्यांत आलें आहे. नव्या फळाला 'अल्फा' असें नांव देण्यांत आलें असून त्यासाठी १७ वर्षें प्रयोग चालू होते.

# जमीनमालकांपुढील महत्त्वाचे प्रश्न

## "मुंबई सरकारचें धोरण शेतीसुधारणेस पोषक नाहीं"

### जमीनमालकांची साधार भीति

( रा. ब. दादासाहेब शेंबेकर )

गेल्या वर्षी आपल्यापुढें खंडकपातीचा प्रश्न होता. त्याबद्दल परिषदेनें घेतलेल्या निर्णयानुसार सदनशीर मार्गानें आपण आपल्यावरील अन्याय दूर करून घेण्याचें काम चालविलें आहे. कूळकायद्याची विफलता आणि त्याचे समाजावर झालेले अनिष्ट परिणाम आपण जनतेपुढें मांडल्यानें मुंबई सरकारचा शेती-सुधारणा हा शब्दच एकप्रकारें हास्यास्पद झाला आहे, आणि गेल्या वर्षी या कूळकायद्यांत नव्या दुरुस्त्या करून सरकारनें तो अधिकच हास्यापद केला आहे. तो नुसताच हास्यास्पद नाहीं तर त्या कायद्यामागें जमीनमालकांची अडवणूक कशी करतां येईल या दृष्टीनेंहि कूळकायद्याची रचना झालेली आहे, हें नव्या दुरुस्त्यांवरून अधिक स्पष्ट होतें व त्याचाच मनाला फार खेद होतो. संरक्षित कुळाकडे पट्ट्यानें असलेली जमीन १ जानेवारी १९५२ रोजी त्या मालकाकडे त्या जमिनीचा वरिष्ठ धारण करणारा म्हणून हक्काचे कागदपत्रांत नोंदलेली असली पाहिजे ही दुरुस्ती पहा, किंवा संरक्षित कुळाच्या नांवें जमिनीचा मालक म्हणून ५० एकर किंवा ५० एकरांपेक्षा जास्त जिराईत जमीन किंवा साडेबारा एकर किंवा त्याहून जास्त बागाईत, गहूं अगर भातशेती जमीन त्यानें संरक्षित कूळ म्हणून धारण केलेल्या जमिनीशिवाय असेल अशा संरक्षित कुळास कायद्याच्या कलम ३२ व ३४ मधील योजनांनीं जे हक्क अथवा अधिकार दिले आहेत ते मिळणार नाहींत असें कायद्यानें ठरवून दिलें असतां त्यांच्याकडील जास्त जमीन सोडण्यास एक वर्षाच्या मुदतीची मालकाकडून नोटीस मिळण्याची आवश्यकता आहे हें सरकारचें म्हणणें घ्या, अथवा एकत्र कुटुंबाकडे राहणाऱ्या जमिनीच्या क्षेत्राची मर्यादा एका कुटुंबाइतकीच असेल ही दुरुस्ती पहा. किंवा स्वतः कसण्यासाठीं जमीन मागितली असतां त्या अर्जाचे सरकारी निकाल पहा, जमीनमालकांची अडवणूक करावयाची व या नाहीं त्या सबबीवर जमीन मालकांना जमीन कबजांत मिळूं द्यावयाची नाहीं हाच एक सरकारी हेतू स्पष्ट होतो.

हायकोर्टानें जमीन मालकांच्या अर्जाचा निकाल देतांना सरकारच्या धोरणासंबंधीं व्यक्त केलेलें मत पहा. जमीन मालकांना वागवण्यांत पक्षपात दिसत असावा म्हणूनच हायकोर्टानें सरकारला उद्देशून निकालपत्रांत स्वच्छ म्हटलें आहे कीं, "कुळांना देण्यांत येणारें संरक्षण हें जमीन मालकांच्या दृष्टीनें अयोग्य व अन्याय्य नाहीं अशी जमिनमालकांची खात्री पटली पाहिजे. आपलेंहि हित संरक्षिलें जाईल याची जमीनमालकांना खात्री देणें अत्यंत आवश्यक आहे. आपल्या हिताकडे सरकार सर्वस्वीं दुर्लक्ष करील ही भीति जमीन मालकांमध्यें उत्पन्न व्हावी ही फार दुर्दैवाची गोष्ट होय."

मुंबई प्रांतांतील जमिनविषयक सामाजिक आणि आर्थिक वस्तुस्थिति आजच्या सरकारनें समजून घेतली नाहीं. साऱ्याच्या पटींत खंड ठरवून दिला आणि तोहि कमीत कमी ठरविला म्हणजे शेती सुधारणेचा एक भाग संपला आणि कुळाची आर्थिक स्थिति सुधारली अशी सरकारनें आपली कल्पना करून घेतली आहे. साऱ्याच्या प्रमाणांत खंड ठरवावा हें नियोजन समितीलाहि मान्य नाहीं. मध्यवर्ती सरकारनें इकडे वेळींच लक्ष दिलें नाहीं तर मुंबई प्रांतांतील शेती सुधारणा उपकारक होण्याऐवजीं विध्वंसकच ठरेल. साऱ्याच्या पटींत खंड हा खरोखरच अन्याय आहे. ज्या जमिनींत पांचशें रुपये किंमतीचें उत्पन्न येतें त्या बागाईत जमिनीचा धारा एक रुपया असला तर मालकाला फक्त पांच रुपये खंड हा खरोखर अन्याय होय, इतकेंच मी थोडक्यांत सांगतों.

### कष्टकरी, तोच खरा शेतकरी

कमींत कमी खंड ठरवला, किंबहुना खंड देण्याचें बंधनच नाहींसें होईल अशी व्यवस्था केली म्हणजे शेतीसुधारणा संपली व कुळाची आर्थिक परिस्थिति प्रत्यक्ष पहाणी न करतांच सुधारली अशी सरकारनें सोयीस्कर कल्पना करून घेतलेली दिसते. केवळ खंड कमी केल्यानें कुळें अधिक धान्य पिकवतील ही कल्पना सूर्यप्रकाशाइतकी खोटी ठरली आहे. पण अजूनहि सरकार जागें होत नाहीं आणि उत्पादनाची सक्ति कुळावर करावयास तयार नाहीं. केवळ कसेल त्याची जमीन असें म्हणणें म्हणजे शेतीधंद्याची थट्टा करण्यासारखें होय. केवळ कसेल त्याची जमीन असें मानलें तर शेतीव्यवसायाचें पावित्र्यच, नष्ट होईल. चार दाणे जमिनींत फेंकावे आणि चार महिन्यांनीं ते वेंचावयास यावें म्हणजे शेती करणें नव्हे. शेती हा धंदा अत्यंत कष्टाचा आहे. शारीरिक श्रम सर्वच धंद्यांत करावे लागतात. पण शेती धंद्यांतील शारीरिक कष्ट करण्याची तऱ्हा कांहीं वेगळीच आहे. वेळेचीं बंधनें या धंद्याला मानवत नाहींत. झोडणारा पाऊस, कडक थंडी, झोंबणारा वारा आणि रखरखणारें ऊन याची पर्वा न करतां अष्टौप्रहर शेतकरी हा आपल्या धंद्यांतच निमग्न असावा लागतो. शेतीचीं कामें वेळच्या वेळीं व्हावींत यासाठीं त्याला अनेक अवधानें संभाळावीं लागतात. प्रसंगीं सावकाराकडे त्याला दुर्लक्षहि करावें लागतें व दुपारच्या घांसाची वाट पहाण्याइतकी त्याला उसंत मिळत नाहीं. स्वच्छ कपडे घालून कचेऱ्यांतून जाणारे कारकून आणि जेवणाचा डबा हातांत घेऊन कारखान्या-कडे धांवत जाणारा आणि घराकडे धांवत परतणारा कामकरी आणि खांद्यावर आसूड टाकून कोंबडा आरवतांच शेतावर जाणारा शेतकरी यांची कष्ट करण्याचे बाबतींत तुलना करून चालणार नाहीं. म्हणून असा जो कष्टकरी कूळ असेल तोच धंदा नीट करूं शकतो व तोच खरा शेतकरी होय. यासाठीं केवळ चार दाणे पेरणाऱ्या कुळाची जमीन होण्यापेक्षां जो पिकवील त्याची जमीन झाली पाहिजे. पण सरकारला पिकवील त्याची शेती हें सुधारणेचें ध्येय आणि धोरण असलें पाहिजे हेंच अजून पटत नाहीं आणि तें पटवून घेण्याचा प्रयत्नहि न करतां उत्पादनाचें बंधन घालणार नाहीं असें सरकारनें म्हणावें हें कांहीं ठीक लक्षण नव्हे. पण पिकवील त्याची जमीन हें आज सरकारला पटलें नाहीं तरी तें उद्यां मान्य करावेंच लागेल. फक्त तें मान्य करणें भाग पडेपर्यंत शेतीधंद्याची काय परिस्थिति होणार हाच काय तो प्रश्न आहे.

### चिंताग्रस्त जमीनमालक

कायदे हे शांतता आणि सुव्यवस्थेसाठीं म्हणजे समाजाच्या कल्याणासाठीं असतात. पण अलीकडील सरकारी कायद्याचें ध्येय व धोरण कितीहि चांगलें आहे असें दासविण्यांत व सांगण्यांत आलें तरी अलिकडील अनेक कायद्यांनीं समाजांत अधिक अशांतता, अधिक अस्वस्थता, अधिक गुंडगिरी वाढली आणि त्याचे परिणाम मध्यमवर्गीय लोकांना व त्यांतहि खेड्यांतील जमीन-मालकांनाच भोगावे लागत आहेत. पोटभर अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं, शांततामय वातावरण नाहीं, निर्धास्त विचार

नाहीं अशा स्थितींत आयुष्याचे क्षण मोजणं भविष्याच्या चिंतेंत कंठवणें कंटाळा वर्ग म्हणजे मुंबई प्रांतांतील जमीनमालकांचा वर्ग होय. जमीनमालक वर्गानें स्वराज्य आणि स्वातंत्र्य यांसाठी दिनरात्र इतरांप्रमाणें चिंता वाहिली खरी. पण भारतावर स्वराज्याचा सूर्य उगवला आणि यांच्या घरांत अंधार झाला. शेतकऱ्यांसाठी करण्यांत आलेल्या कायद्यांचे प्रत्यक्ष परिणाम काय झाले याची चौकशी करण्याची कामगिरी गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेकडे नियोजनसमितीनें दिली आहे. या संस्थेनें आपला अहवाल सादर करण्यापूर्वी मुंबई प्रांतिक जमीनमालक परिषदेच्या प्रतिनिधींना चर्चा करण्याची संधि द्यावी. या आवश्यक अशा पहाणीचे कार्यांशी सर्व प्रकारें सहकार्य करण्याची जमीनमालकांची तयारी आहे. सध्या परिस्थितीचें आकलन होण्यास जमीनमालकांच्या संघटणेचा उपयोग या पहाणीच्या कामीं करून घ्यावा अशी उपरोक्त संस्थेचे संचालक प्रा. धनंजयराव गाडगीळ यांना आमची विनंति आहे.

### गैरहजर मालकी

गैरहजर मालकी नष्ट करण्याबद्दल सरकार लौकरच एक कायदा करणार आहे. या बाबतींत असें प्रथमच स्पष्टपणें सांगितलें पाहिजे कीं, गैरहजर मालकी ही कांहीं प्रमाणांत तरी रहाणारच. ती सर्वस्वी नष्ट करणें सरकारलाहि शक्य नाहीं. मग आज सरकार कांहीं घोषणा करो. प्रथम गैरहजर मालकी म्हणजे काय हें अद्याप अनेकांच्या लक्षांत आलें नाहीं असें दिसतें. किंबहुना ज्या तलाठ्यामार्फत गैरहजर मालकांची आंकडेवारी गोळा करण्यांत आली त्यांनाहि ही नीटशी समजली नाहीं. ज्या गांवांत शेती त्या गांवांत मालक रहात नसला म्हणजे तो गैरहजर मालक असा कांहीं मामलेदारांनीं अर्थ लावून आंकडेवारी कळविल्याचें ऐकतों. जो स्वतः किंवा आपल्या देखरेखीखालीं जमीन कसत नाहीं तो त्या जमिनीचा गैरहजर मालक होतो. गैरहजर मालकीची ही साधी आणि सोपी व्याख्या आहे आणि असे जे गैरहजर मालक आहेत त्यांच्या जमिनीवरील हक्क काढून घेण्याचें सरकारनें जाहीर केलें आहे. पण अशी मालकी नष्ट करण्याची कोणतीहि योजना आंखण्यापूर्वी जमीनमालकांपैकी जे मागतील त्यांच्या जमिनी स्वतः कसण्यासाठी त्यांना मिळाल्याच पाहिजेत. जमीन कसण्याचा पहिला हक्कदार जमिनीचा मालक आहे. हा हक्क सरकारला केव्हांहि नाकारतां येणार नाहीं. नियोजन समितीनें हा हक्क नाकारला नाहीं. एखाद्याचा जमीन कसण्याचा हक्क काढावयाचा तर मालकास कमींत कमी ५ वर्षांचा अवधी त्याला दिला पाहिजे. पांच वर्षांत त्यानें स्वतः जमीन कसण्याचें नाकारलें तर ती जमीन स्वतः कसण्यासाठीं मागण्याचा त्याचा हक्क नष्ट होईल अशी तरतूद असलीच पाहिजे. त्याचप्रमाणें अज्ञान, शारीरिक व्यंगानें स्वतः जमीन करण्यास असमर्थ, बायाबापड्यांच्या जमिनीवरील मालकीहक्क काढून घेतां येणार नाहींत. कुळानें अर्ज करावा कीं लगेच सरकार आपल्या अधिकारांत जमिनीची किंमत ठरवितें. ती अगोदरच असलेली अल्प किंमत फेडण्यास पंधरा वर्षांचे दहा हप्ते त्याला ठरवून मिळतात आणि ते हप्ते भरले किंवा त्यानें एकरकमी भरणा केला कीं जमीनमालकांची जमीन विकण्याची इच्छा नसली तरी त्याला सरकार त्या जमिनीचें खरेदीपत्र करून देतें. अशी तरतूद असणाऱ्या कलमांसह कूळकायदा घटनेंत समाविष्ट करण्याची सरकारनें जी कारवाई आणि घिसाडघाई केली ती घिसाडघाई म्हणजे जमीनमालकांचा सरकारनें केलेला विश्वासघात होय. आवश्यक ती संधि देऊनहि जे समर्थ मालक स्वतः जमीन कसणार नाहींत त्यांची घरीं जमीन न करण्याचीं अनेक कारणें असूं शकतील. तीं कोणतीहि कारणें असोत. जमिनीवरील त्यांचे हक्क नाहींसे करतांना त्याला त्याच्या जमिनीची योग्य किंमत मिळालीच पाहिजे. साऱ्याच्या पटींत जमिनीची किंमत ठरवून देण्याचा सरकारचा विचार आहे असें ऐकतों. धान्याच्या पटींत खंड ठरविणें हा जसा जुलूम तसाच साऱ्याच्या पटींत जमिनीची किंमत घेण्याची जमीनमालकांवर कायद्यानें सक्ति करणें हाहि जुलूमच होय. दोन आणे आकाराच्या जिराइत जमिनीची साऱ्याच्या वीस पट किंमत आणि पाटाच्या पाण्याखालीं असणाऱ्या जमिनीचीहि साऱ्याच्या वीसपट किंमत देणें म्हणजे जुलुमाचा कळस होय. नियोजन समितीला साऱ्याच्या पटींत खंड ठरविणें हें जसें मान्य नाहीं त्याचप्रमाणें साऱ्याच्या पटींत जमिनीची किंमत ठरविणें हेंहि मान्य नाहीं.

### जमीनमालकांच्या मागण्या

(१) खंडाचें प्रमाण मूळ कायद्यांत ठरवून दिलें आहे त्यांत केलेले बदल तहकूब करून उत्पादनाच्या ⅓ व ¼ हें पूर्वीप्रमाणें खंडाचें प्रमाण असावें.

(२) जे जमीनमालक स्वतः करण्यासाठीं जमिनी मागत असतील त्यांना ती तात्काळ परत करण्यांत यावी.

(३) जमिनीच्या खरेदी-विक्रीवरील निर्बंध दूर करण्यांत यावेत.

(४) गैरहजर मालकी नष्ट करण्यापूर्वी जमीनमालकांस स्वतःची शेतवाडी करण्यास पांच वर्षांची मुदत देण्यांत यावी.

(५) ज्या जमिनी कुळांना घ्यावयाच्या त्यांच्या किंमती गेल्या दहा वर्षांतील खरेदीविक्रीचें प्रमाण पाहून ठरविण्यांत याव्यात.

(६) त्याप्रमाणें जी किंमत ठरेल ती सरकारनें जमीनमालकांना ३॥ टक्क्याचे निगोशीएबल बॉंडस् देऊन चुकती करावी.

(७) शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षा लक्षांत घेऊन व त्यांची रहाणी वाढवावयाची आहे हें भारत सरकारचें धोरण लक्षांत घेऊन शेतकऱ्याच्या एका कुटुंबास वार्षिक किती उत्पन्न झालें पाहिजे तें निश्चित केल्यावर जमीन धारण करण्याचें प्रमाण ठरवावें.

(८) कमाल क्षेत्र किमान क्षेत्राच्या तीन पट ते पांच पट असावें.

(९) अविभक्त कुटुंबाचें जमीन धारण करण्याचें प्रमाण विभक्त कुटुंबाच्या तीन पट तरी असावें.

(१०) कुळांवर उत्पादनाचें बंधन घालावें व त्यांचेकडून शेतीउत्पादन करण्यास लागण्यापूर्वी आवश्यक ती साधनसामुग्री आहे कीं नाहीं हें पाहिल्याखेरीज दशवार्षिक अथवा संरक्षित कुळाचे हक्क त्यास मिळूं नयेत. कूळकायद्यांत या तात्पुरत्या सुधारणा आम्हीं सुचविल्या आहेत. याचा विचार करण्याची सुबुद्धि आमच्या सरकारला यावी अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. सरकार वरीलसारख्या सुधारणा न करील तर शेतीधंद्याचा भविष्य काळ मोठा कठीण असून त्यांतून कोणती प्रकरणें निर्माण होतील हें तुम्हांआम्हांसहि सांगतां येत नाहीं.

(मुंबई प्रां. जमीनमालक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण)

## मोटारअपघातांत विमाकंपनीवरील जोखीम

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

"थर्ड पार्टी रिस्क" खालील मोटारअपघातांच्या विम्याबाबत एक महत्त्वाचा निवाडा मुंबई हायकोर्टांत न्या. तेंडोलकर ह्यांनीं नुकताच केला आहे. श्री. चंदुलाल एम्. शहा ह्यांच्या मोटारखालीं श्री. विमलाबाई वसिष्ठ ह्यांची मुलगी प्रभा ही सांपडून मरण पावली. त्याबद्दल श्री. विमलाबाईनीं श्री. शहावर १ लक्ष रुपये नुकसानभरपाईचा दावा लावला. २३ नोव्हेंबर, १९५३ रोजीं, इंडिअन मोटर वेहिकल्स कायद्याच्या ९६ (२) कलमाप्रमाणें विमा कंपनीवर (जनरल ॲशुरन्स सोसायटी लि. वर) नोटीस बजावण्यांत आली. अशी नोटीस बजावल्यानंतर प्रतिवादीवर हुकूमनामा झाला, तर त्याची रक्कम भरण्यास ९६ (२) कलमाप्रमाणें विमा कंपनी जबाबदार होते. अर्थात्, दाव्यांत प्रतिवादी म्हणून ९६ (२) कलमांत सांगितलेल्या कारणासाठींच फक्त विमा कंपनी दाखल होऊं शकते. प्रस्तुत प्रकरणांत त्यापैकीं एकहि कारण अस्तित्वांत नव्हतें, म्हणून विमा कंपनीला प्रतिवादी करतां येणें अशक्य होतें. ह्यासाठीं, प्रतिवादी शहाच्या वतीनें बचाव करण्यास कंपनीनें हायकोर्टाची परवानगी मागितली. विमा कंपनी विमेदाराच्या वतीनें नेहमींच्या इतर दाव्यांत प्रतिवादी होऊं शकते, तशी ह्या प्रकरणांतहि ती प्रतिवादी होण्यास हरकत नाहीं, असें न्यायमूर्तींनीं सांगितलें. "विमेदारानें बचाव करण्यांत हयगय केली किंवा बचाव करण्यास आडमुठेपणानें नकार दिला, तर काय होईल? हुकूमनामा झाला तर त्याची भरपाई करण्यास मात्र विमा कंपनी बांधलेली रहाणार, परंतु तिला कोर्टांत म्हणणें मांडण्यास परवानगी नाहीं, अशी विचित्र परिस्थिति होईल. विमा कंपनीविरुद्ध निवाड्याची अंमलबजावणी व्हावयाची, तर तिला तिचें म्हणणें मांडण्याची संधि न मिळणें अन्यायाचें आहे. प्रस्तुत प्रकरणांत शहांना द्यावी लागणारी नुकसानभरपाईची रक्कम भरून देण्यास विमा कंपनी तयार आहे, पण शहांनीं विमा पॉलिसीच्या अटी मोडल्या असल्या तर त्याबाबत विमा कंपनीचे जे काय अधिकार असतील, ते शहांनीं नाकारतां कामा नयेत. विमा कंपनीशीं शहांचें वर्तन गैरवाजवी असल्यानें, कंपनीला दाव्यांत प्रतिवादी म्हणून येऊं देणें अगदीं योग्य आहे. कारण, कंपनीनें नुकसानभरपाईची रक्कम देण्यास मान्यता दिलेलीच आहे." असा न्यायमूर्तींच्या निवाड्याचा गोषवारा आहे.

---

**सूर्याचे फोटो घेण्याचे नवे प्रयत्न**—पृथ्वीच्या सपाटीपासून ७५,००० फुटांवरून सूर्याचे फोटो घेण्याचे प्रयत्न ब्रिस्टल विद्यापीठाचे संशोधक करणार आहेत. ह्या कामासाठीं २०० फूट लांबीच्या बलूनचा उपयोग करण्यांत येणार आहे. ह्या बलूनमध्यें ६० फुटांचा एक टेलिस्कोप बसविण्यांत येईल आणि त्याच्या साह्यानें सूर्याचे फोटो घेण्यांत येतील. फोटो घेतल्यावर टेलिस्कोप आणि कॅमेरा बलूनपासून आपोआप वेगळे होतील.

**पाकिस्तानमधील चहाचें उत्पादन**—१९५३ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत पाकिस्तानमधील चहाच्या मळ्यांत ४६,१८७,००० पौंड चहाचें उत्पादन झालें. सप्टेंबर महिन्यांत सर्वांत अधिक म्हणजे ८,५००,००० पौंड चहा तयार झाला. १९५३ सालीं ५०,०००,००० पौंड चहाचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. १९५२ सालीं ५२,०००,००० पौंड चहा तयार झाला.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,२००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,९००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८

## चेकवरील सहीची भाषा माहीत नसणाऱ्या बँक अधिकाऱ्यानें चेक पास केला

### मद्रास हायकोर्टाचा बँकेविरुद्ध निवाडा

वादीची (श्री. के. एम. अप्पु चेट्टिअर) कोणीतरी बनावट सही करून २३ डिसेंबर, १९५३ रोजीं हैद्राबाद स्टेट बँकेवर १५,००० रुपयांचा चेक काढला व बँकेनें त्या चेकची रक्कम दिली. ही गोष्ट वादीच्या नजरेस आल्यावर त्यानें पोलिसांत तक्रार गुदरली, आणि बँकेवरहि मद्रास हायकोर्टांत दावा लावून रक्कम परत मागितली. बनावट सही करणारा पोलिसांना सांपडूं शकला नाहीं.

"सही बनावट असल्याची बँकेला कांहींच माहिती नाहीं; चेकबुकाबद्दल दक्षता वादीनें न बाळगल्यामुळें लबाडी होऊं शकली; म्हणून बँकेवर दावा चालू शकणार नाहीं," असें बँकेतर्फे सांगण्यांत आलें.

न्यायमूर्तींनीं बँकेसच निष्काळजी ठरविलें आणि वादीस १५,००० रु. देवविले. चेकवरील सही तामीळ भाषेंत होती आणि तो चेक पास करणाऱ्या अधिकाऱ्याला तामीळ अजिबात येत नव्हतें!

---

### बेकारीच्या प्रश्नावरील एक दृष्टिकोन

दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर श्री. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं बेकारीच्या प्रश्नासंबंधीं माटुंगा येथील पोद्दार कॉलेजमध्यें बोलतांना पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं खेड्यांतील लोकांची शहराकडे जाण्याची जी वृत्ति दिसून येते तिला आळा घातल्याशिवाय बेकारीचा प्रश्न लवकर सुटणार नाहीं. भारतामधील सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणारी यांत्रिक शेती देशाला सोईस्कर ठरणार नाहीं. नियोजनमंडळानें दर एकरीं उत्पादनाचा विचार न करतां दर माणशीं उत्पादनाचा विचार केला पाहिजे. दर एकरीं पिकाचाच विचार केला तर मोठ्या आणि लहान शेतांच्या उत्पादनक्षमतेंत फरक दिसून येत नाहीं. कधीं कधीं तर छोट्या शेतांत मोठ्या शेतापेक्षा दर एकरीं उत्पादन अधिक झालेलें दिसून येतें. बेकारांना नोकऱ्या देणें हें धोरण तर योग्यच आहे. परंतु जे कांहीं उद्योगधंदा स्वतंत्रपणें करीत आहेत त्यांना योग्य तितकें उत्पन्न मिळेल अशी परिस्थितीहि निर्माण केली पाहिजे. नियोजन मंडळानें बेकारांच्या संख्येचा अंदाज बरोबर बांधलेला नाहीं. कारण ह्या संख्येंत स्वतःचा उद्योग करणारे लोक जमेला धरण्यांत आलेले नाहींत. एकूण काम करणाऱ्यांत अशा लोकांची संख्या जवळ जवळ ७० टक्के आहे. पण त्यांना पुरेशी प्राप्ति मात्र होत नाहीं. कापडाच्या धंद्यावरील नियंत्रणें काढून टाकण्यांत यावींत. हातमाग आणि गिरण्यांचें कापड ह्यांच्यांतील स्पर्धा टाळण्यासाठीं सरकारनें दोन्हीं प्रकारचें कापड एकत्र करावें आणि जरूर तर स्वतःच कापडाचें वांटप करावें.

# समृध्दीकडे मार्गक्रमण

लांब व भव्य आगगाडी धड् धड् धक् धक् करीत येते आणि खरं खरं करीत थांबते. उत्सुक आणि आतुर असे खेडूत भोंवती जमतात...... खेडूतांच्या आयुष्यांतील ती एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना असते. कारण खेडयांतील उत्पादन, त्यांच्या श्रमाचें तें फल, त्या आगगाडींतून शहरांत जाणार असतें.

आगामी काळांत, आपल्या खेडयांतील उत्पादन हजारो मैल लांबीच्या आगगाडीच्या मार्गांवरून व रस्त्यांवरून शहरांत वाहून नेलें जाईल. पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत ३,००० मैल लांबीचे आगगाडीचे मार्ग पुन्हां बांधले जातील. दळणवळणांच्या कार्यक्षम पद्धतीचा पाया घालण्यासाठीं ७७० मैल लांबीचे नवे कॉंक्रीटचे रस्ते आणि ६६ प्रचंड पूल बांधले जातील. व्यापार, उद्योगधंदे आणि संस्कृति ह्यांच्या ह्या मार्गांवरून आपली जनता अधिक सुसंपन्न व अधिक परिपूर्ण आयुष्याकडे मार्गक्रमण करील.

लाखो टन पोलाद पंचवार्षिक योजनेंतील विविध कल्पना अमलांत आणण्यासाठीं वापरलें जाईल. आणि म्हणून, आपल्या राष्ट्राच्या व जनतेच्या अधिक सुसंपन्न व अधिक फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्त्वपूर्ण तऱ्हेने उपयोगास येईल.

दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील
कंपनी लिमिटेड.





हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.